# माजी सैनिकांचा महामेळावा
# 'सन्मान एवम समाधान'

१५-१६ फेब्रुवारी २०२४ रोजी पुण्यातील मिल्खा सिंग क्रिडासंकूलात दक्षिण मुख्यालयाच्या नेतृत्वाखाली माजी सैनिक (ESM) महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. ज्याची थीम **'सन्मान एवम समाधान'** होती. माजी सैनिकांच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात सुमारे ३००० माजी सैनिकांचा सक्रिय सहभाग होता. मेळाव्यात आलेल्या सर्व माजी सैनिक व अवलबिंताचे एकविशेष टोपी व दक्षिण मुख्यालय माहिती पुस्तक देऊन स्वागत केले. ११ राज्यांतील ५८ ठिकाणावरील आणखी ४०,००० माजी सैनिक दूरदृश्य प्रणाली च्या माध्यमातून सहभागी झालेले होते. लेफ्टनंट जनरल ए के सिंग, पीव्हीएसएम, एव्हीएसएम, वायएसएम, एसएम, व्हीएसएम, दक्षिण मुख्यालयाचे आर्मी कमांडर, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या माजी सैनिकांचा सन्मान आणि समर्थन करण्याच्या महत्त्वावर जोर दिला. तसेच दक्षिण कमांडने हाती घेतलेल्या विविध कल्याणकारी योजना ११ राज्यांमध्ये




राबविण्या च्या उपक्रमांवर प्रकाश टाकला. या रॅलीमध्ये जिल्ह्यातील माजी सैनिक, विधवा, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांना मिळत असलेल्या पेन्शन, ईसीएचएस, सीएसडी कॅन्टीन आणि इतर सेवांमध्ये सुधार करण्यावर भर होता. मेळाव्याला संबोधित करण्यासाठी याप्रसंगी इतर अतिथी वक्त्यांमध्ये अतिरिक्त CGDA श्रीमती देविका रघुवंशी, IDAS आणि संचालक ब्रिगेडियर राजेश गायकवाड (निवृत्त),सैनिक कल्याण विभाग,महाराष्ट्र राज्य, पुणे,

यांचा समावेश होता. अतिरिक्त CGDA यांनी PCDA (P) प्रयागराज यांच्या मार्फत राबवली जाणारी SPARSH पेन्शन योजने ची अंमलबजावणी करीता उत्त्पन झालेल्या समस्यांवर प्रकाश टाकला. त्यांनी स्पर्श प्रणालीतील सर्व त्रुटी दूर करण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी त्या व त्यांचे सहकारी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सैनिक कल्याण विभागा मार्फत राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजनाबाबत अवगत केले आणि राज्य सैनिक मंडळामार्फत अधिक कल्याणकारी योजना उपलब्ध करून देण्यासाठी घेतलेल्या पुढाकारांची माहिती दिली. मेळाव्यात सहभागी झालेल्या सर्वांना दुपारी १.०० वाजता उत्तम भोजनाची सोय केली गेली.




जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे यांच्या मार्फत विविध जिल्हयातील माजी सैनिक, विधवा, वीरनारी, वीरमाता, वीरपिता तसेच माजी सैनिक संघटना यांचे प्रतिनिधी यांना विविध माध्यमांव्दारे सुमारे दोन महिने अगोदर पासून मेळाव्याच्या तारखेची व वेळेची माहिती दिली.

पुणे जिल्हयातील सर्व माजी सैनिक संघटना प्रतिनिधींची दि. ०९ जानेवारी २०२४, १७ जानेवारी २०२४, ०५ फेब्रुवारी २०२४ तसेच ०९ फेब्रुवारी २०२४ रोजी बैठकांचे आयोजन करुन जास्तीत जास्त सैनिक व त्यांचे अवलंबितांचे उपस्थित राहण्यास योग्य ती कार्यवाही करण्यासाठी प्रवृत्त करण्यात आले.

तसेच संपूर्ण राज्यासाठी विविध प्रकारच्या समस्या सादर करण्यासाठी एक विनंती अर्ज तयार करुन तो सर्व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयास पाठवून देण्यात आला.




संपूर्ण राज्यातून माजी सैनिकांच्या अडि-अडचणींचे अर्ज स्विकारले व त्यांचे संकलन करुन सी.डी.ए.(ओ) पुणे यांना सादर करण्यात आले. त्यामुळे मेळाव्याच्या अगोदर सदर समस्यांचे समाधान पी.सी.डी.ए. इलाहाबाद यांच्याव्दारे करण्यात आले.

मेळाव्याच्या दिवशी विविध एजन्सी व्दारा माजी सैनिक व त्यांचे अवलंबितासाठी ने-आण करणेसाठी चोवीस बसेसचे आयोजन करण्यात आले. पुणे जिल्हयातून १९ बसेस, सातारा जिल्हयातून ०४ व अहमदनगर जिल्हयातून ०१ बसेसची सोय करण्यात आली.

मेळाव्या मध्ये जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे यांचेमार्फत दोन स्टॉलचे आयोजन करण्यात आले.

१) स्टॉलमध्ये जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे व सैनिक कल्याण विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

२) स्टॉलमध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला योग्य मार्गदर्शन करुन समस्याचे निवारण कोणत्या कांऊटरवर होईल याची माहिती देण्यात आली. सदर कांऊटरवर पोहचण्यासाठी त्यांना मदत केली. तसेच PCDAचे प्रतिनिधी यांच्याशी संवाद साधून जास्तीत जास्त माजी सैनिकांचे प्रश्न सोडवण्यास मदत करण्यात आली.

३) तसेच विविध रेकॉर्डच्या प्रतिनिधीशी संपर्क करुन सर्व माजी सैनिक व अवलंबितांच्या अडि-अडचणी सोडवण्यास मदत करण्यात आली.

४) ई.सी.एच.एस. संबंधित अडि-अडचणी सोडवण्यासाठी संबंधित प्रतिनिधीशी संवांद साधून माजी सैनिकांना मदत करण्यात आली.



जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, राज्य सैनिक बोर्ड तसेच केंद्रिय सैनिक बोर्ड व्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या विषयी सर्व माजी सैनिक व त्यांच्या अवलंबितांना अवगत करण्यात आले.

अशाप्रकारे माजी सैनिक महा मेळावा यशस्वीपणे संपन्न झाला असून माजी सैनिक व त्यांचे अवलंबित यांनी समाधान व्यक्त करुन आयोजनाबाबत कौतुक केले जात आहे.

या महामेळाव्यात MoD (लष्कर) च्या IHQ मधील उल्लेखनीय उपस्थितांचे तसेच ECHS, AWHO, AWPO आणि रेकॉर्ड ऑफिसेसच्या प्रतिनिधीं चे आयोजन करण्यात आले होते. SPARSH पेन्शन, ECHS, AWPO , कॅन्टीन सेवा यासह इतर प्रमुख क्षेत्रांशी संबंधित चर्चा आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी स्टॉल्स देखील स्थापित केले गेले. सन्माननीय माजी सैनिकांच्या अडी-अडचणी ऐकूण त्यांचे प्रभावीपणे निराकरण केले गेले. रॅली मध्ये एक आनंदाचे वातावरण तयार झाले. अशाप्रकारे, पुण्यातील ‘सन्मान एवम् समाधान’ मेगा रॅली मोठ्या प्रमाणात समाधानकारक पणे यशस्वी ठरली.